PAGE NO. :
DATE : / /

# आनंदाचा झरा

भारतीय संस्कृतीत सणावाराला एकत्र येवून आनंद मिळविण्याची प्रथा आहे. परंतु आजकाल परदेशातील नोकरी, व्यवसाय व कामातील व्यापामुळे एकत्र येणे दुर्मिळ होत चालले आहे काही जण बडे बडे मॉल, बिग बाझार यांच्या आकर्षक जाहिरातींच्या आमिषाने खरेदी करुन आनंद घेत असतात.

खरा आनंद हा एकमेकांच्या अडिअडचणीच्या वेळी मदत करण्यात आहे.


गणपती उत्सवात आमचे कुटुंब एकत्र येऊन उत्सव साजरा करते व त्यातून एकमेकांच्या कलागुणांना वाव मिळतो मिळतो व त्यातूनच सर्वांना आनंद मिळतो

वाढदिवसाच्या प्रसंगी एकमेकांना शुभेच्छा देवूनही आनंद घेता येतो.

दिवाळीत आपण फटाके, आतीषबाजी उडवतो परंतु तो क्षणिक आनंद असतो त्या पैसा त्या पैशातून एखाद्या गरजवंताला मदत केल्यास मिळणारा आनंद चिरकाल आहे.

शास्त्रीय संगीत व भजन यामुळे मिळणारा
ब्रह्मानंद वेगळाच आहे.

शेवटी आनंद कशात मानायचा हे
ज्याच्या त्याच्या स्वभावावर अवलंबून
आहे. लहान मूल हे सर्वाधिक
आनंदी व निरोगीस असते. मनुष्य
जीवनात आनंद मिळवायचा असेल तर
एकमेकांच्या उपयोगी पडणे यातच खरे
सुख व समाधान आहे. एखाद्याला अपेक्षा
न ठेवता मदत करणे यातही आनंद
सामावलेला आहे. एखाद्या कलेच्या निर्मिती
तूनही आनंद मिळविता येतो. भगवंताच्या
नामस्मरणातून सतचित आनंद मिळतो
शेवटी आनंद हा आपल्या जवळच
असतो आणि तो पैशाने विकत
मिळत नाही.



राजन चक्के
मो ९९२१४८५८२६

